मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वधारलेला डॉलर 'श्रीमंत' पालिकेला महाग

## जागतिक बँकेकडून काढले 159 कोटींचे कर्ज : अजून सुमारे 207 कोटींची रक्कम फेडणे बाकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने कासारवाडीतील नाशिक फाटा चौकात दुमजली उड्डाण पूल बांधण्यासाठी जागतिक बँकेकडून १५९ कोटी ११ लाखांचे कर्ज घेतले होते. ते कर्ज डॉलरमध्ये फेडण्याची अट असल्याने आणि एकरकमी रक्कम स्वीकारली जात नसल्याने महापालिकेची डोकेदुखी वाढली आहे. दहा वर्षांपूर्वीचा डॉलरचा भाव आणि आताचा वधारलेला डॉलर लक्षात घेता हे कर्ज 'श्रीमंत' असा नावलौकिक असलेल्या महापालिकेस डोईजड झाले आहे.

महापालिकेने मोठा गाजावाजा करीत निगडी ते दापोडी ग्रेडसेपरेटर मार्ग निर्माण केला. त्या मार्गात अडथळा ठरणारी लाखो घरे व दुकानांवर हातोडा फिरवला. निगडी ते दापोडी मार्ग विनासिग्नल असल्याने त्या मार्गावरील नाशिक फाटा चौकात भारतरत्न उद्योजक जेआरडी टाटा दुमजली उड्डाणपूल बांधण्यात आला. मात्र, सिग्नल फ्री रस्त्याची महापालिकेची घोषणा धडधडीत खोटी ठरली आहे. मार्ग व पूल होऊन दहा वर्षे झाले तरी, अद्याप हा मार्ग सिग्नल फ्री झालेला नाही.

दरम्यान, नाशिक फाटा पुलाचा खर्च अधिक असल्याने महापालिकेने जागतिक बँकेचे १५९ कोटी ११ लाखांचे कर्ज जानेवारी २०१५ ला घेतले. कासारवाडीहून भोसरीच्या दिशेने आणि भोसरी-पिंपळे गुरव या भागांना जोडणारा असे दोन पूल आहेत. हे पूल दापोडी-निगडी जुना महामार्ग, पुणे-लोणावळा लोहमार्ग आणि पवना नदी ओलांडून गेले आहेत. त्यामुळे शहराचे दक्षिण व उत्तर भाग एकमेकांना जोडले गेले आहेत.




### डॉलरचा भाव वाढला की, कर्जाची रक्कम वाढणार !

» भविष्यात डॉलरचा भाव वाढतच राहणार आहे. त्यामुळे कर्जाची रक्कमही वाढतच जाणार आहे. डॉलरनुसार परतफेडीच्या जाचक अटीमुळे हे कर्ज तब्बल ३० टक्के वार्षिक व्याजदराने पडत आहे. आर्थिक क्षमता मजबूत असल्याने कर्ज एकरकमी भरण्याबाबत महापालिकेने जागतिक बँकेकडे तसा वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. मात्र, जागतिक बँकेने महापालिकेस सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. कर्जाच्या नियम व अटीनुसारच २०३९ पर्यंत कर्जाची परतफेड करा, असे स्पष्ट शब्दात बँकेने महापालिकेस कळवले आहे.

### वाढता वाढे जागतिक बँकेचे कर्ज

» जागतिक बँकेकडून घेतलेले हे कर्ज डॉलरमध्ये घेण्यात आले. ते फेडण्याची अटही डॉलरमध्ये आहे. तसेच, कर्ज एकरकमी फेडता येणार नाही, अशा अटीसह महापालिकेने हे कर्ज घेतले होते. जानेवारी २०१५ ते जानेवारी २०२४ या दहा वर्षांत महापालिकेने ७५ कोटी ४७ लाख २२ हजार १३० रुपयांचे कर्जाचे मुद्दल फेडले आहे. व्याजापोटी ३५ कोटी २७ लाख ९५ हजार १२ रुपये फेडले आहेत. गेल्या दहा वर्षांत डॉलरचे भाव वाढतच आहेत. सध्या एका डॉलरचा भाव ८३ रुपये ७२ पैसे इतका आहे. डॉलरचे भाव सातत्याने वाढत असल्याने महापालिकेत आता १६४ कोटी ७७ लाख ८३२ रुपयांचे मुद्दल फेडणे बाकी आहे.

# महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयातील पिण्याच्या पाण्यात आढळल्या अळ्या

## महापालिकेच्या थेरगांव रुग्णालयातील पिण्याचे पाणी असलेल्या फिल्टरची योग्य साफसफाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या थेरगांव रुग्णालयातील पिण्याचे पाणी असलेल्या फिल्टरची योग्य साफसफाई होत नसल्याचे दिसून आले आहे. रुग्णालयात येणार रुग्ण, नातेवाईक दररोज फिल्टरचे पाणी स्वच्छ आहे म्हणून पितात. पण, त्याच पाण्यात अळ्या आढळून आल्या आहेत. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाकडून नागरिकांसह रुग्णांच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार सुरू आहे.

थेरगावात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे शंभर खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारण्यात आले आहे. या रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण, त्यांचे नातेवाईक, नागरिक औषधोपचार घेण्यास येत असतात. रुग्णालयात महापालिकेकडून दिशा एंटरप्रायझेस या ठेकेदार संस्थेच्या माध्यमातून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, स्वच्छ पाणी मिळावे म्हणून सर्वत्र फिल्टर बसवले आहेत. त्या फिल्टरच्या साफसफाईचे काम संबंधित ठेकेदार संस्थेला दिलेले आहे. थेरगाव रुग्णालयात चैतन्य शिंदे हे आजारी असल्याने ते रुग्णालयात दाखल आहेत. त्यांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी त्याच्या पत्नी अलका ह्या रुग्णालय तळमजल्यावर गेल्या होत्या. तेथील पिण्याच्या पाण्याचे फिल्टरमधून त्यांनी बॉटलमध्ये पाणी घेतले. पण, बाटली भरल्यानंतर त्यांना त्या पाण्यात अळ्या असल्याचे दिसून आले.





### अळ्या असणारे पाणी आयुक्तांना भेट देणार

» ठेकेदाराकडून कामात हलगर्जीपणा केला आहे. संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकण्यात यावे. अशी मागणी आम आदमी पार्टीचे रविराज काळे यांनी केली. तसेच अळ्या असलेली पाण्याची बाटली सोमवारी आयुक्तांना भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

» रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण, त्यांचे नातेवाईक, नागरिक औषधोपचारास येत असतात. रुग्णालयात फिल्टरमध्ये पिण्याचे पाणी स्वच्छ असेल म्हणून डोळे झाकून सगळे पितात. पण, त्या फिल्टरची योग्य साफसफाई न केल्याने अळ्या तयार झाल्या आहेत. त्यामुळे रुग्णालय प्रशासनच नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे. प्रत्येक आठ दिवसांमध्ये दोन वेळा थेरगाव रुग्णालयात असणारे सर्व फिल्टर्स साफ करणे बंधनकारक आहे. जर त्या पाण्यामध्ये अळ्या आढळून येतात.

# मिळकतकराचा धनादेश न वटलेल्या मिळकतधारकावर कारवाई

## पुणे महापालिकेने सुरु केली कलम 138 अंतर्गत कारवाई, धनादेश न वटलेल्या मिळकतधारकावर दंड आणि दोन वर्षे कारावास

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकराचा धनादेश न वटलेल्या मिळकतधारकावर कलम १३८ अन्वये नोटीस बजावण्याची कारवाई पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाने सुरू केली आहे.

मिळकतकराचा धनादेश न वटलेल्या मिळकतधारकावर कलम १३८ अन्वये नोटीस बजावण्याची कारवाई पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाने सुरू केली आहे.

महापालिकेचे उपायुक्त माधव जगताप यांनी याबाबत माहिती दिली. चेक बाऊन्स होणे हा दंडनीय गुन्हा मानला जातो आणि असे झाल्यास दंड आणि दोन वर्षे कारावास अशा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. त्याच्याविरुद्ध कलम १३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो. चेक बाऊन्स हा न्यायालयाच्या भाषेत कायदेशीर गुन्हा मानला जातो. यामध्ये १८८१ च्या निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट अंतर्गत शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

१ एप्रिल ते ३१ जुलै २०२४ अखेर एकूण १ हजार ९६८ धनादेशाची रक्कम ८ कोटी ३३ लाख ९३ हजात ८४३ रुपये आहे. त्यापैकी न वटलेल्या १ हजार २९२ धनादेशाची रक्कम ४ कोटी ५७ लाख ३५ हजार ३१७ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण १४७ मिळकतींना कलम १३८ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. या मिळकतींची थकबाकीची अंदाजे रक्कम २ कोटी ३९ कोटी इतकी आहे. या मिळकतधारकांवर दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आल्याचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी न भरल्याने मिळकत सील करण्यासाठी आलेल्या पथकाला अनेक मिळकतधारक धनादेश देऊन कारवाई टाळतात. मात्र, जे धनादेश दिले जातात, अशा अनेक खात्यांमध्ये पैसेच नसल्याने अथवा चुकीच्या सहीमुळे ते वटत नाहीत म्हणजेच बाऊंस होतात. काही मिळकतधारकांच्या बाबतीत वारंवार हे प्रकार घडत आहेत. त्यामुळे महापालिकेने अशा मिळकतधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

वारंवार चुकीचे अथवा खात्यात रक्कम नसतानाही धनादेश देणाऱ्या १४७ मिळकतधारकांना कलम १३८ अन्वये नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. त्यामुळे या नोटीसनंतर मिळकतकराची थकबाकी न भरल्यास या मिळकतधारकांना दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास भोगण्याची वेळ ओढावण्याची शक्यता आहे.




### 147 जणांना नोटीस

» महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार दि. १ एप्रिल ते ३१ जुलै २०२४ अखेर महापालिकेस थकबाकी वसुलीपोटी १,९६८ धनादेश मिळाले आहेत. या धनादेशांची एकूण रक्कम ८ कोटी ३३ लाख ९३ हजार ८४३ रुपये असून, त्यापैकी न वटलेल्या १,२९२ धनादेशाची रक्कम ४ कोटी ५७ लाख ३५ हजार ३१७ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. त्यातील वारंवार बाऊंस होणाऱ्या १४७ मिळकतींना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यांची थकबाकी सुमारे २ कोटी ३९ लाख रुपये इतकी आहे.

### धनादेश न वटल्यास काय ?

» धनादेश न वटल्यास चेक देणाऱ्या व्यक्तीला त्याची माहिती द्यावी लागते. त्यानंतर त्याला एक महिन्याच्या त्याने पैसे देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्या व्यक्तीला कायदेशीर नोटीस पाठवली जाते. त्यानंतरही १५ दिवसांत उत्तर न दिल्यास कलम १३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो. संबंधित धनादेश काढणाऱ्या व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते.

> “जप्तीची कारवाई टाळण्यासाठी अनेकजण धनादेश देत आहेत. मात्र, प्रत्यक्षात बँकेत पैसे नसणे, चुकीची सही करणे, धनादेशात जाणीवपूर्वक चूक करणे असे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे थेट कारवाईचा निर्णय घेण्यात आला आहे.”
>
> - माधव जगताप, उपायुक्त, कर संकलन विभाग, मनपा.

# राज्य शासनापर्यंत धग; भुसार बाजार कनिष्ठ लिपीक नियुक्तीप्रकरण तापले

## सेवा ज्येष्ठते नुसारनियुक्ती करणे अपेक्षित असताना शेकडो कर्मचाऱ्यांना डावलून कनिष्ठ लिपीकांची भुसार विभाग प्रमुख व वाहन प्रवेश विभाग पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे प्रकरण चांगलेच तापले

**पुणे | प्रतिनिधी**

सेवा ज्येष्ठते नुसारनियुक्ती करणे अपेक्षित असताना शेकडो कर्मचाऱ्यांना डावलून कनिष्ठ लिपीकांची भुसार विभाग प्रमुख व वाहन प्रवेश विभाग पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे प्रकरण चांगलेच तापले असून आमदार माधुरी मिसाळ यांच्यामाध्यमातून राज्य शासनापर्यंत याची धग गेली आहे. त्यातच आता व्यापाऱ्यांना प्रशासनावर अविश्वास दर्शवित, या प्रकरणाची चौकशी सुरू आहे तर संबंधीतास भुसारप्रमुख पदावर कार्यरत कसे ठेवले, असा प्रश्न उपस्थित करीत चौकशी होइपर्यंत संबंधीताचे निलंबन करावे, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

या प्रकरणी सुरुवातीला पणन खाते प्रमुखांकडे तक्रार आली, पणन संचालक विकास रसाळ यांनी सदर प्रकरणात सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांना चौकशीचे आदेश दिले त्यानंतरही चौकशी कामात वेळकाढूपणा व चालढकलपणा होत असल्याने जोपर्यंत चौकशीचे न्यायलयीन काम पूर्ण होत नाही तोपर्यंत कनिष्ठ लिपीकास कार्यरत ठेऊ नये. अशी मागणी व्यापाऱ्यांनी लावून धरली आहे.

चौकशी लांबविण्याबाबत व कारवाईस टाळाटाळ होत असल्याबाबत भुसार प्रमुखाला जाणीवपूर्वक पाठीशी घातले असल्याचे आरोप आता व्यापारी करीत आहेत. भाजप पक्षाच्या आमदार माधुरी मिसाळ यांनीही सदर प्रकरणात पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे भुसार प्रमुखाची तातडीने चौकशी करून कारवाई करा अशी, लेखी तक्रार केली आहे. त्यामुळे पणन संचालक चौकशीबाबत आता तरी गंभीर दखल घेणार का. हे पाहावे लागेल.



> “भुसार प्रमुखाविरोधात अनेक व्यापाऱ्यांनी चेंबरकडे तक्रारी केल्या असून अनेक व्यापाऱ्यांनी धक्कादायक माहिती दिली आहे. सदर प्रकरणी पणन संचालकांकडे चेंबरकडून लेखी तक्रार करण्यात आली असून चौकशी सुरू असताना भुसार प्रमुखाला त्यापदावर ठेऊ नये. अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे. ”
>
> - रायकुमार नहार, अध्यक्ष, पुणे मर्चंट चेंबर.

> “व्यापाऱ्यांना नाहक त्रास दिला जात असून दहशत केली जात आहे. व्यापाऱ्यांची तक्रार असताना फौजदारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तीला भुसार प्रमुख पदावर काम करण्यास नेमणे यातून बाजार समितीच्या कारभारावरच प्रश्न निर्माण होतात. आम्ही लेखी तक्रार केली आहे. त्यास पदावर ठेवण्याचा अट्टाहास कशासाठी.”
>
> - प्रवीण चोरबेले, माजी अध्यक्ष, पुणे मर्चंट चेंबर.

# ऑनलाइन पेमेंट चालेल का? अजिबात नाही

## देश डिजिटल क्रांतीकडे झेपावला असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयात अजूनही रोखीनेच व्यवहार सुरु आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

देश डिजिटल क्रांतीकडे झेपावला असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयात अजूनही रोखीनेच व्यवहार सुरु आहे. रुग्णाने किंवा नातेवाइकाने ऑनलाइन पेमेंट चालेल का? विचारल्यावर समोरुन उत्तर येते अजिबात नाही.

रुग्णांना उपचार घेण्यासाठी अजूनही रोख शुल्क जमा करावे लागते. एकाही काऊंटरला ऑनलाइन पेमेंटची सुविधा नसल्याने रुग्णांना खिशात सुट्टे पैसे घेऊनच रुग्णालयात पाय ठेवावा लागतो. केस पेपर काढण्यापासून ते उपचार घेतल्याची बिले भरण्यापर्यंत रोख पैसे भरणे शक्य होत नसल्यामुळे रुग्णांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे लवकरात लवकर रुग्णालयांमध्ये ऑनलाइन पेमेंटची सोय करावी, अशी मागणी नागरीक करत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची शहरात एकूण ३२ दवाखाने आणि ८ मोठी रुग्णालये आहेत. संत तुकारामनगर येथे महापालिकेचे ७५० खाटांचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आहे. पुणे जिल्ह्यातील नागरिक उपचारासाठी महापालिकेच्या रुग्णालयात येतात. यासह जिजामाता, तालेरा, भोसरी, आकुर्डी, थेरगाव तसेच मासुळकर कॉलनीतील नेत्र रुग्णालय पर्ण क्षमतेने चालू आहे.




### पथारीवाला मोठा की पालिकेची रुग्णालये ?

» सध्या सर्वच क्षेत्रात ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध झाली आहे. परंतु, महापालिकेच्या एकाही रुग्णालयात अद्याप ही सुविधा सुरु केली नाही. एकीकडे नागरिकांचा मालमत्ता कर ऑनलाइन जमा करुन घेतला जातो. निविदा प्रक्रिया, कामाची बिले, विद्यार्थ्यांसाठी डीबीटी, कर्मचा-यांना दरमहा वेतन करण्यासाठी ऑनलाइन पेमेंट पध्दतीचा अवलंब केला जातो.

### नागरिकांची गरज दुय्यम ?

» महापालिकेकडे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा मिळकत कर जमा होतो. त्यातील खूप मोठा हिस्सा ऑनलाइन पेमेंटच्या माध्यमातून जमा होतो. नागरिकांनी मिळकत कर वेळेपूर्वी भरावा, यासाठी ऑनलाइन पेमेंट सुविधा, सुट्टीच्या दिवशीही भरण्याची सोय, वेळेपूर्वी भरल्यास सवलत अशा अनेक उपाययोजना पालिका स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविते. परंतु जिथे नागरिकांना गरज असते तिथे मात्र चर्चेचे गुऱ्हाळ सुरु राहते. स्वतःच्या फायद्यासाठी ऑनलाइन पेमेंट स्कीम राबविणारी महापालिका रुग्णांना मात्र सुट्ट्या पैशांसाठी पळवते. नागरिकांची पालिकेच्या दृष्टीने दुय्यम आहे का ?

> महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वरिष्ठांची चर्चा झालेली आहे. ऑनलाईन पेमेंटसाठी लागणारी प्रक्रिया पार पाडण्याच्या दृष्टीने तयारी सुरु आहे. लवकरच सर्व रुग्णालयात रोख स्वरुपासह ऑनलाईन पेमेंटची सुविधा ही उपलब्ध करुन दिली जाईल
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे,आरोग्य वैद्यकीय.

जिल्ह्यातील लाखो रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयांमध्ये दररोज येतात. यासह उपनगरांमधील ३२ दवाखान्यांत हजारो रुग्णांवर दररोज उच्च दर्जाचे उपचार केले जातात. या रुग्णालयाच्या माध्यमातून पालिकेने वैद्यकीय यंत्रणा संक्षम केली असली तरी सर्वच रुग्णालयात व दवाखान्यांत अजूनही केस पेपर काढण्यासाठी रोख पैसे भरावे लागतात.

केस पेपर काढण्यासाठी लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. त्यातच काही रुग्णांकडे सुट्टे पैसे नसल्यास त्यांना रांगेतून बाहेर पडावे लागते. कसेबसे पैसे मिळवून पुन्हा केस पेपर काढण्यासाठी रांगेत उभे रहावे लागते. यात रुग्णांची तसेच त्यांच्या नातेवाइकांची प्रचंड गैरसोय होत आहे. परिणामी, रुग्णांनी वैद्यकीय व्यवस्थेवरच नाराजी व्यक्त केली आहे.

# पिंपरी ते निगडी विस्तारित मार्गासाठी मेट्रोचा महापालिकेच्या जागांवर डोळा

## विस्तारित मार्गासाठी आणखी 15 जागांची महापालिकेकडे मागणी केली आहे.,त्यातील बहुतांश जागा कायमस्वरूपी देण्याबाबत महामेट्रोने आग्रह धरला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील अतिशय मोक्याच्या दहा ठिकाणच्या जागा यापूर्वी घेतल्यानंतर आता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पिंपरी ते निगडी विस्तारित मार्गासाठी आणखी १५ जागांची महापालिकेकडे मागणी केली आहे. त्यातील बहुतांश जागा कायमस्वरूपी देण्याबाबत महामेट्रोने आग्रह धरला आहे.

दापोडी ते पिंपरी मार्गावरील मेट्रोची मार्गिका पूर्ण होऊन वाहतूक सुरू झाली आहे. यासाठी महापालिकेने शहरातील अतिशय मोक्याच्या दहा ठिकाणच्या जागा पुणे मेट्रोसाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने हस्तांतरित केल्या आहेत. मात्र, महामेट्रोची स्थिरता, तिकिटेतर उत्पन्न वाढविण्यासाठी या जागांचा वाणिज्यिक वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने या जागा मेट्रोला मालकी हक्काने आणि बिनशर्त द्याव्यात, अशा सूचना राज्य सरकारने आयुक्तांना दिल्या आहेत. याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.



पिंपरी ते निगडी या मार्गावरील मेट्रो मार्गिका, स्थानके, प्रवेशद्वार, जिना आणि उद्वाहन (लिफ्ट), वाहनतळासाठी महामेट्रोने महापालिकेकडे १५ जागांची मागणी केली आहे. या जागांमध्ये निगडी बस टर्मिनल येथील सहा जागा आहेत. त्यांचे क्षेत्रफळ ३ हजार ५६२.२९३ चौरस मीटर आहे. निगडी येथील रिकामी व पदपथाची जागा अशा दोन जागा त्यांना हव्या आहेत.

### मेट्रोची चार स्थानके

» पिंपरी ते निगडी मार्गावर मेट्रोची चार स्थानके असणार आहेत. चिंचवड स्टेशन, आकुर्डीतील खंडोबा माळ चौक, निगडीतील टिळक चौक आणि भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पीएमपीएमएल आगारात शेवटचे स्थानक असणार आहे. स्थानकांच्या उभारणीसाठी त्या ठिकाणच्या दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यावरील पदपथाची जागा मेट्रोला हवी आहे.

### विविध 15 जागांची मागणी

» महामेट्रोने पिंपरी ते निगडी मार्गावरील विविध १५ जागांची मागणी केली आहे. भाडेतत्त्वावर जागा देण्यात येणार आहेत. त्या संदर्भातील मूल्यांकन करून दर ठरविण्यासाठी नगररचना विभागास पत्र दिले आहे. त्यांच्याकडून उत्तर मिळाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले. स्थानके, प्रवेशद्वार, जिन्यासाठी जागा लागणार आहे. त्यासाठी १५ जागांची महापालिकेकडे मागणी केली आहे.

# तर मी खासदार झालो असतो, मनोज जरांगे यांचं मोठं विधान

## मागणी मान्य होणारच नसेल तर भुजबळांचा एवढा आटापिटा का? असा सवाल करतानाच आम्ही आमचं पाहून घेऊ, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले

**पुणे | प्रतिनिधी**

सगेसोयऱ्याची मागणी टिकणारी नाही तर मग छगन भुजबळ एवढा विरोध कशाचा करत आहेत? ही मागणी मान्य होणारच नसेल तर भुजबळांचा एवढा आटापिटा का? असा सवाल करतानाच आम्ही आमचं पाहून घेऊ, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

भाजप नेते नारायण राणे आणि प्रवीण दरेकर यांना माझ्यावर टीका करण्याचं काम लावण्यात आलं आहे. त्यांच्यामागे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. आमदार आणि काही संघटनांना जमा करून मला उघडं पाडण्याचं अभियान सुरू आहे. मला एकटं पाडण्यासाठी सरकारचा हे षडयंत्र आहे. त्याला अभियान असं नाव दिले गेलं आहे, असा गंभीर आरोप करतानाच मला राजकारण आवडत नाही. तसं असतं तर मी या आधीच खासदार झालो असतो, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. राजकारणात काही डाव खेळावे लागतात. ते डाव या राजकारण्यांनीच मला आता शिकवले आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला.

मनोज जरांगे पाटील हे कोल्हापुरात होते. यावेळी त्यांनी हा आरोप केला. जे आम्हाला सहकार्य करणार नाहीत त्यांना आम्ही निवडणुकीत पाडू. आमच्यासोबत गरीब ओबीसी सुद्धा आहेत. आताच काही तरी होऊ शकतं हे त्यांना देखील कळलं आहे. राजकीय पक्षांच्या यात्रा त्यांच्या स्वार्थासाठी आहेत. त्यांना पक्ष मोठे करायचे आहेत. 29 तारखेला अंतरवली सराटीमध्ये या. मराठा काय असतो हे दाखवतो, असा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढण्याचे संकेत दिले आहेत. 14 ते 20 ऑगस्टदरम्यान सर्व 288 मतदारसंघाचा आढावा घेण्यात येणार असून निवडणूक लढायची की नाही याचा निर्णय जरांगे पाटील 29 ऑगस्टला घेणार आहेत. निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी कागदपत्रं तयार ठेवावीत असंही जरांगे म्हणालेत.

आम्हाला ओबीसीतून आरक्षण द्या, आम्हाला निवडणूक लढवण्यासाठी भाग पाडू नका असा इशारा मनोज जरांगेंनी राज्य सरकारला दिला आहे. तर जरांगेंच्या निवडणूक लढवण्याच्या वक्तव्यावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पलटवार केला. जरांगे स्वतःसाठी लढणार आहेत की समाजासाठी असा सवाल हाकेंनी विचारला आहे.




### आम्हालाच राजकीय फायदा होणार

» ओबीसी नेत्यांकडून कुणबींचा आकडा फुगवून सांगितला जात आहे. त्यामुळे गैरसमज पसरत आहेत. आता आमचा राजकीय फायदा आम्हालाच होणार आहे. आरक्षणाची ही लाट गोरगरीब मराठ्याच्यांच्या कामाला येणार आहे. सलग एक वर्ष चालणार देशातलं कदाचित हे एकमेव आंदोलन आहे. एक वर्षानंतरही हे आंदोलन तितक्याच तीव्रतेने सुरू आहे. माझ्या मागे कोण आहे हे शोधण्यासाठी गोदापट्ट्यात ड्रोन लावले. मात्र अजूनही त्यांना कोणी सापडले नाही. माझ्यामागे कोण आहे? मला पैसे कोण पुरवतो? याच्यावर त्यांची नजर होती, असा आरोपही त्यांनी केला..

### आमची पोळी भाजणार आहे

» आमच्या भांडणांमुळे राजकारण्यांची पोळी भाजणार नाही. तर त्यांच्या भांडणामुळे आमची पोळी भाजली जाणार आहे, असं सांगतानाच मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलणाऱ्यांना मी सोडत नसतो. राज्यातला विरोधी पक्ष किमान आरक्षणाच्या विरोधात तरी बोलत नाही. सत्ताधारी मात्र थेट उलट बोलत आहेत, असा हल्लाच मनोज जरांगे पाटील यांनी चढवला.

### व्याख्या दिली आहे

» सगेसोयरे आणि रक्त संबंध यात फरक आहे. रक्ताच्या नात्यात लग्न होत नाही. सगेसोयरे कुणाला म्हणावे? लाभार्थी कोण असू शकतात? याची व्याख्या आम्ही सरकारला दिली आहे. मात्र, सध्या ते अडचणीत आहेत. मराठा समाजामध्ये गैरसमज निर्माण करण्याचा हा प्रयत्न सुरू आहे, असं सांगतानाच कोल्हापुरातील एक नेता आहे. तो आता पुण्याचं प्रतिनिधत्व करतोय. तो काहीही बरळत आहे, असा टोला जरांगे यांनी भाजप नेते चंद्रकांत पाटील यांना लगावला..

# विधानसभा निवडणुकीची लढाई मुद्याची आहे, गुद्याची नाही : आमदार दिलीप मोहिते पाटील

## निवडणुकीच्या अगोदरच अशी शिवराळ भाषा करीत असतील तर समाजाचे काय कल्याण करणार. माझे उत्तर विकास कामातून आहे, असे प्रत्युत्तर

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची लढाई मुद्याची आहे, गुद्याची नाही. निवडणूक लागल्या नाहीत विरोधकांनी अजून फॉर्मही भरला नाही, निवडणुकीच्या अगोदरच अशी शिवराळ भाषा करीत असतील तर समाजाचे काय कल्याण करणार. माझे उत्तर विकास कामातून आहे, असे प्रत्युत्तर खेड-आळंदी विधानसभेचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी इच्छुकांच्या टीकेला दिले आहे.

शिवस्वराज्य यात्रेची सभा शुक्रवारी (दि. 9) संतोषनगर (वाकी, ता. खेड) येथे झाली त्यावेळी पवार गटातील इच्छुक उमेदवारांनी आमदार मोहितेंवर टीका केली होती, त्या टीकेला आमदार मोहिते यांनी शनिवाई (दि. 10) उत्तर दिले आहे. आमदार दिलीप मोहिते पाटील म्हणाले, मी रोज समाजचे काम करतो, त्यांचे प्रश्न समजून घेऊन सोडवणूक करतो. विरोधकांनी कितीही खालच्या पातळीवर टीका करुद्या,

मी सयंम सोडणार नाही. माझे कार्यकर्ते संयम सोडणार नाहीत. शेवटी समाज हा माणसाची पारख करतो, आपले बोलणे, आपले वागणे, आपले विचार आणि राहणीमान या गोष्टी आपल्याला पुढे नेत असतात; मात्र विरोधकांनी जी शिवराळ भाषा केली. त्यामुळे तालुक्यात हे काय करणार याचा विचार जनता करीत आहे. त्यांची माणसे त्यांच्या समोर जी शिवराळ भाषा वापरतील यातून त्याचेच नाव कमी होणार आहे. त्यामुळे डॉ कोल्हे, जयंत पाटील हे माझ्यावरील टीकेचा नक्की विचार करतील.



### पाटलांच्या सभेला रोजंदारीवरेली माणसे आणली

» जयंत पाटील यांच्या सभेत माणसे नव्हती. आली होती ती माणसे रोजंदारीवर आणलेली होती त्यामुळे पाटील बोलायला उठल्यावर ती माणसे, महिला सभेतून निघून गेली. ज्यांच्या मागे समाज, जनता नाही त्यांनी असे बेताल वक्तव्य करू नयेत. कळमोडीचे पाणी तालुक्यातील पूर्व भागाला मिळावे यासाठी माझे प्रयत्न सात्यत्याने सुरु आहेत. तालुक्यातील पूर्व भागातील लोकांना लवकरच कळमोडीचे पाणी मिळणार आहे

### मतदार यादीत माझा रोल नाही

» मतदार यादीत अनेक नवे दुबार आहेत, मयत असलेल्या व्यक्तींची होती ती निवडणूक आयोगाने कमी केली आहेत. यात माझा रोल नाही. निवडणूक आयोग माझ्या सांगण्यावर नाव कमी करतात नवीन घेतात हे विरोधकांचे अज्ञान आहे. विरोधकांचा अभ्यास कमी आहे. निवडणूक मतदार यादीत नावे घ्यायचे, वगळण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. त्यामुळे हा आरोप चुनावी जुमला आहे. ते जे बोलतात, वागतात ते आपल्या नेत्याला मान्य आहे का हे तरी विरोधकांनी तपासून पाहावे. असा टोलाही आमदार मोहितेंनी लगावला.